पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी - चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला,
चिंचवड पुणे ४११०३३,

जा.क्र पोउआ/वाहतूक/उपक्रम/ ई- /२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक २८/१२/२०२३

# प्रेसनोट

## वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

मा. पोलीस आयुक्त, कार्यालय पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रामध्ये वाहतूक शाखेचे प्रत्येक प्रभारी अधिकारी यांनी आपापले विभागामध्ये महिन्याच्या दर आठवडयामध्ये दर गुरूवारी “एक दिवस शाळेसाठी” हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत वाहतूक शाखेच्या एकुण २० टिमच्या माध्यमातुन दर गुरूवारी २० शाळांमध्ये जावुन विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमन, अपघात विषयी माहिती, व्यसनाधिनतेपासुन दुर राहणे, सायबर गुन्हेगारी, सोशल मिडियाचा वापर इत्यादी मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

आज दि. २८/१२/२०२३ रोजी वाहतूक शाखेमार्फत चौथ्या टप्प्यात एकुण २० टिमच्या माध्यमातुन, निवडलेल्या २० शाळांमधुन सुमारे ५२०० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचुन त्यांना पीपीटीद्वारे मुद्देसूद् मार्गदर्शन केले. “एक दिवस शाळेसाठी” या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत एकुण चार टप्प्यामध्ये २५२९१ विद्यार्थांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक व चांगला माणुस बनावे या दृष्टीकोनातून पिंपरी चिंचवड वाहतूक विभागामार्फत या प्रबोधनपर उपक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यात आले आहे. तसेच या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान श्री. नरेंद्रमोदी लिखीत “ एक्झाम वॉरियर्स ” या पुस्तकाचे सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

वरील उपक्रम मा. श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बापू बांगर पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा यांचे संकल्पनेतून श्री. भास्कर डेरे सहायक पोलीस आयुक्त-१ वाहतूक शाखा, श्री. सतीश कसबे सहायक पोलीस आयुक्त -२ वाहतूक शाखा व वाहतूक शाखेचे सर्व पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांचे मार्फतीने आज दि. २८/१२/२०२३ रोजी यशस्वीरित्या पार पडला. उत्फुर्त प्रतिसाद मिळणा-या या विद्यार्थीभिमुख उपक्रमाचा पुढील टप्पा ०४ जानेवारी २०२४ रोजी पार पडणार आहे.

28/12/2023.
( बापू बांगर )
पोलीस उप - आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

प्रत: १) पोलीस निरीक्षक प्रेसरूम पोलीस आयुक्त, कार्यालय, पिंपरी चिंचवड
२) सर्व संपादक/ वार्ताहर, सर्व लोकप्रिय वृत्तपत्रे.